

| वर्ष - 8 । अंक - 65 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

गणपती बाप्पा मोरया



www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 11 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## शिंदे गटाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला अजित पवारांची अनुपस्थिती

# “...तर मोठा विध्वंस होईल”!

## मिटकरींचा शिंदे गटाला इशारा; महायुतीत नेमकं काय घडतंय?

**। मुंबई । महाईन्यूज**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विधानसभा मतदारसंघ बारामती येथे घडलेल्या एका घटनेमुळे महायुतीतलं वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. बारामतीत शिंदे गटाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला अजित पवार यांनी निमंत्रण देऊनही उपस्थिती दर्शवली नाही म्हणून शिंदे गटाने नाराजी व्यक्त केली होती. मात्र ही नाराजी व्यक्त करताना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कृतीमुळे अजित पवार गट संतप्त झाला आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाने गणेशोत्सवानिमित्त बारामती येथील शारदा प्रांगणात एका सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. अजित पवारांना या कार्यक्रमाचं निमंत्रण दिलं होतं. मात्र अजित पवार या कार्यक्रमाला न आल्याने शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे यांनी कार्यक्रमस्थळी लावलेल्या पोस्टर्सवरील अजित पवारांचे फोटो काळ्या कपड्याने झाकले. त्यामुळे शहरात तणाव निर्माण झाला होता.



दरम्यान, यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रवक्ते व विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. मिटकरी म्हणाले, “प्रत्येक पक्षात असे हौशे, नवशे, गवसे असतात. कोणी काळे झेंडे दाखवून अपमान करतं, तर कोणी पोस्टर काळ्या कपड्याने झाकून विरोध दर्शवतं. मात्र यामुळे त्यांच्याच पक्षांची बदनामी होते. काही दिवसांपूर्वी भाजपाच्या कार्यकर्त्या आशा बुचके यांनी अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले होते. त्यांच्यामुळे भाजपाचीच बदनाम झाली. आता शिंदे गटाच्या

### ...तर आमच्या भावनेचा उद्रेक होऊ शकतो : मिटकरी

अमोल मिटकरी म्हणाले, “महायुतीत तीन पक्षांमध्ये एकवाक्यता असायला हवी. ती असल्याशिवाय विधानसभा निवडणुकीत महायुतीला यश मिळणार नाही. अशा पद्धतीने दररोज जाणीवपूर्वक काहीतरी नवीन गोष्ट करून एखाद्या पक्षाला डिवचण्याचा प्रयत्न होत असेल तर महायुतीच्या समन्वय समितीने यात लक्ष घातलं पाहिजे. या लोकांना त्यांच्या वरिष्ठांनी तंबी दिली पाहिजे. कारण आमच्याही भावनेला काही मर्यादा आहेत. आमच्याही भावनेचा उद्रेक होऊ शकतो आणि तसं झाल्यास मोठा विध्वंस होईल”.

### “आमच्या मर्यादेचा अंत पाहू नका”; मिटकरींचा संताप

राष्ट्रवादीचे आमदार म्हणाले, “कोणताही कार्यकर्ता उठतो आणि अशा प्रकारे अजित पवारांच्या पोस्टरवर काळा कपडा टाकून सूर्याला झाकण्याचा प्रयत्न करतो. हे पाहून मला असं वाटतं की हा उन्मत्तपणा आहे. त्यांच्या उन्मत्तपणाला आमच्या कार्यकर्त्यांनी उत्तर दिलं आहे. शिशुपालासारख्या शंभर चुका माफ होतात. शेवटी भगवान श्रीकृष्णानेही संयम सोडला होता. आपण ते महाभरतात वाचलंच आहे. घोडा अन् मैदान दूर नाही, अजून वेळ गेली नाही. त्यांच्या नेत्यांनी त्यांना योग्य समज द्यावी. शेवटी आमच्या संयमालाही काही मर्यादा आहेत, आमच्या मर्यादेचा अंत पाहू नका”.

---

## ‘सर्वसामान्यांवर जी कारवाई, तीच कारवाई माझ्या मुलावरही’!

## अपघात प्रकरणी बावनकुळे स्पष्टच बोलले

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

नागपूर येथील अपघाताच्या घटनेतील कार ही माझ्या मुलाच्या नावावर आहे. गाडी चालवणारा, त्यामध्ये बसणारा, यांच्यावर जो काही गुन्हा दाखल होत असेल तो पोलिसांनी करावा. सर्वसामान्यांवर जी कारवाई होते, ती कारवाई माझ्या मुलावरही झाली पाहिजे,’ अशी प्रतिक्रिया व्यक्त करत भारतीय जनता पक्षाचे



प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या अपघाताच्या तपासात पोलिसांवर दबाव आणला नसल्याचा दावा केला. बावनकुळे यांनी मंगळवारी पुण्यातील गणपती मंडळांना भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी नागपूर येथील घटनेबाबत भाष्य केले. नागपूर येथील अपघाताच्या घटनेतील कार बावनकुळे यांच्या मुलाच्या नावावर असल्याने पोलिसांवर तपासादरम्यान दबाव असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर बावनकुळे म्हणाले, ‘माझ्यासोबत काल दिवसभर गृहमंत्री होते.

### ‘येणार तर महायुतीच’

निवडणूक काळात काही सर्व्हे येत असतात. त्यातून काही लोकांना समाधान वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे केंद्रातील सरकार पाच वर्षे आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आले तरच केंद्र आणि महाराष्ट्रातील योजना सुरू राहतील. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणे म्हणजे केंद्र सरकारच्या योजना बंद पाडणे, हे जनतेला माहिती आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना असो का अन्य योजना, या महाविकास आघाडी सरकार बंद पाडेल. त्यामुळे काहीही सर्व्हे असले तरी राज्यात महायुतीचे सरकार येणार आहे, असे बावनकुळे म्हणाले. ‘सर्वशक्तीनिशी पवारांपाठीमागे’ “उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत भाजप मैत्रीपूर्ण लढती करेल, असे वृत्त चुकीचे आहे. भाजपची सर्व ताकद पवारांच्या पाठीमागे आगामी निवडणुकीत असेल. पवारांच्या उमेदवारांपाठीमागे भाजपचे कार्यकर्ते खंबीरपणे उभे असतील” असे बावनकुळे म्हणाले.

# सगळं मुख्यमंत्र्यांकडे ढकलून देऊ नका!

## तरुणीच्या अर्जावरुन पवारांनी आयुक्तांना खडसावलं

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे हडपसर विधानसभा मतदारसंघात एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी एका तरुणीने वैद्यकीय मदत मिळविण्यासाठी महापालिका आणि जिल्हा प्रशासनाकडे अनेक वेळा अर्ज केले. मात्र कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाही, म्हणून अजित पवार यांच्याकडे मदतीची मागणी केली.**



आज उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्यातील मानाच्या गणपतींचे दर्शन घेण्यासाठी आले होते. दीड वर्षापूर्वी शरद पवार यांची साथ सोडत अजित पवार हे काही आमदार सोबत घेऊन शिंदे, फडणवीस यांच्या सरकारमध्ये सहभागी झाले. या नव्या सरकारमध्ये अजित पवार हे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्रीपदावर विराजमान झाले. त्यानंतर अजित पवार यांनी थेट पक्षावर दावा करत पक्षाचे नाव आणि चिन्ह सर्व प्रक्रिया पार पडत मिळविले. तर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात पक्षातील वादावर न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. त्याच दरम्यान दुसऱ्या बाजूला शरद पवार यांच्या पक्षाला निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार हे नाव दिले आणि तुतारी हे चिन्ह दिले. त्या सर्व झालेल्या राजकीय घडामोडीदरम्यान लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांचा महायुतीला अधिक फायदा होईल असे वाटत होते. मात्र त्या निवडणुकीत महाविकास आघाडीला सर्वाधिक जागांवर त्यांचे उमेदवार निवडून आणण्यात यश आले. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये देखील महाविकास आघाडीला अधिक यश मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर महायुतीकडून राज्यभरात दौरे, मेळावे आणि बैठका घेतल्या जात आहे. त्याच दरम्यान गणेशोत्सव सुरू झाला असून पुणे शहरात विविध पक्षांचे नेतेमंडळी गणपतीच्या दर्शनासाठी येत आहेत.त्यावर अजित पवार उपस्थित अधिकारी वर्गाकडून नेमकी माहिती जाणून घेत होते. त्यावेळी मुख्यमंत्री साहाय्यता निधीकडे अर्ज करण्यात आल्याचे महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी सांगितले. तुम्ही सगळं मुख्यमंत्र्यांकडे ढकलून देऊ नका, अशा स्पष्ट शब्दांत महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांना अजित पवार यांनी खडसावलं.हडपसर विधानसभा मतदारसंघातील स्व. विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाची राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहणी केली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या आणि माजी महापौर वैशाली बनकर यांच्या विशेष प्रयत्नांतून पाच नागरिकांना रिक्षा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्या रिक्षाचालकांना अजित पवार यांच्या हस्ते रिक्षाचे वाटप करण्यात आले. त्यावेळी एका तरुणाला रिक्षाची चावी देत असताना, त्या तरुणाची तब्येत पाहून अजित पवार म्हणाले की, आरे एवढी तब्येत, बाळा तब्येत कमी कर, एवढ्या कमी वयात एवढी तब्येत योग्य नसल्याचे सांगताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. त्यानंतर उपस्थित रिक्षाचालकांसोबत त्यांनी संवाद साधला. या दरम्यान फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्याला अजित पवारांनी सुनावलंबँकांनी किती व्याजदर आकारले आहे. त्यावर उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले की, बँकेमार्फत रिक्षा घेतली तर १० टक्के आणि फायनान्स कंपनीकडून घेतल्यावर १३ टक्के असल्याचे सांगितले.

### व्याज भरून भरून हे मरतात

या दरम्यान फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्याला अजित पवारांनी सुनावलंबँकांनी किती व्याजदर आकारले आहे. बँकेमार्फत रिक्षा घेतली तर १० टक्के आणि फायनान्स कंपनीकडून घेतल्यावर १३ टक्के असल्याचे सांगितले. त्यावर अजित पवार यांनी एका रिक्षाचालकाला तुम्हाला काय व्याज लावले. मला १३.५ टक्के व्याज लावले. हे ऐकताच आरे बापरे, कसं परवडणार असं अजित पवार म्हणाले. हे फायनान्सकडून केले. बँकांकडून का केले नाही. व्याज भरून भरून हे मरतात, हे तर पठाणी व्याज झालं, अशा शब्दात अजित पवारांनी फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्याला सुनावले.

# पुण्यात गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचाच 'आव्वाज'!

## कमाल मर्यादा पातळीचा भंग; दोनशे मंडळांच्या ठिकाणी तपासणी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांत शहरात सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीने ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा ओलांडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोजण्यात आलेल्या ध्वनिपातळीतून हे स्पष्ट झाले आहे.**



यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने दिले आहेत.त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजली जात आहे. हे काम एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे. या संस्थेने राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या साह्याने ध्वनिप्रदूषण पातळी मोजण्यास सुरुवात केली आहे. दररोज सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही पातळी मोजली जाते. ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा पातळी दिवसा ७५ डेसिबल आणि रात्री ७० डेसिबलपर्यंत आहे. शहरात सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी ७५ ते ८५ डेसिबलदरम्यान नोंदविण्यात आली आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात शहरभर ध्वनिप्रदूषण होत असल्याची बाब उघडकीस आली आहे.गणेशोत्सवातील वाढत्या ध्वनिप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कल्याणी मांडके यांनी लवादाकडे याचिका दाखल केली होती.

### 100 वॉट ध्वनिक्षेपक लावण्यास बंदी

शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजली जात आहे. यात राज्य सरकार, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महापालिका आणि पुणे पोलिसांना प्रतिवादी करण्यात आले होते. पुण्यात गणेशोत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. यावर महाराष्ट्र प्रदूषण मंडळासह पुणे पोलिसांना ध्वनिप्रदूषण कमी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. प्रत्येक गणेश मंडळाला १०० वॉटपेक्षा जास्त क्षमतेचे ध्वनिक्षेपक लावण्यास राष्ट्रीय हरित लवादाने बंदी घातली आणि ढोल-ताशा पथकात ३० पेक्षा जास्त वादकांचा समावेश करण्यास मनाई केली.

## पिंपरीत आमदार आण्णा बनसोडे यांच्या 'गुगली' मुळे

# मविआतील तिघांची 'विकेट'?

### पुण्यात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेतल्याची चर्चा : बनसोडे महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवण्याच्या तयारीत?

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील निर्णायक मतदार संघ म्हणून ओळखला जाणाऱ्या पिंपरी विधानसभा मतदार संघ अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित आहे. २०२८ पर्यंत हे आरक्षण कायम राहणार आहे. सध्या ज्या काही राजकीय घडामोडी समोर येत आहेत. त्यामध्ये विद्यमान आमदार आण्णा बनसोडे यांनी टाकलेली "गुगली" फिट बसली, तर मतदार संघातील महाविकास आघाडीतील प्रभावी दावेदार तीन उमेदवारांची 'विकेट' पडणार आहे.**



भाजपा महायुतीतील घटक पक्ष राष्ट्रवादी अजित पवार गटाचा विद्यमान आमदार असताना मित्र पक्ष भाजपा आणि आरपीआयने पिंपरीवर 'क्लेम' केला आहे. किंबहुना, "विद्यमान आमदार निवडून येणार नाहीत. त्यामुळे ही जागा एकतर आरपीआयला सोडावी किंवा मी घड्याळ चिन्हावर लढण्यास तयार आहे," अशी घोषणा माजी नगरसेविका व आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे यांनी केली आहे. दुसरीकडे, भाजपा आणि आरपीआयच्या स्थानिक नेत्यांची नुकतीच संयुक्त बैठक झाली. या बैठकीत आगामी निवडणुकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. भाजपाने पिंपरीची जागा आरपीआयला सोडण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्याबाबतचा ठरावही मंजुर झाला आहे, असा दावा आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर यांनी केला आहे.

या घडामोडी सुरू असतानाच आज आमदार आण्णा बनसोडे यांनी पुण्यात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी भोसरीतील माजी आमदार विलास लांडे हेसुद्धा उपस्थित होते. त्यामुळे आण्णा बनसोडे "तुतारी" हातात घेणार का? अशी चर्चा जोर धरू लागली आहे. मात्र, बनसोडे यांनी याबाबत अधिकृत दुजोरा दिलेला नाही.

आता आमदार बनसोडे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला, तर या मतदार संघातून इच्छुक असलेल्या माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, ठाकरे गटाचे माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार आणि महाविकास आघाडीतून ठाकरे गटाकडून तीव्र इच्छुक असलेल्या माजी नगरसेविका सीमा सावळे यांची महाविकास आघाडीकडून उमेदवारीची "विकेट" पडणार आहे. बनसोडे यांच्या खेळीमुळे सावळे, शिलवंत यांना "अपक्ष" लढण्याची तयारी ठेवावी लागेल. तसेच, ही निवडणूक बहुरंगी होईल, असे राजकीय जाणकार सांगतात.

#### कोण अपक्ष मैदानात उतरणार...

महायुतीच्या जागावाटपामध्ये पिंपरी मतदार संघ केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियासाठी सोडावा, असा आग्रह धरला आहे. तसेच, 'आरपीआय'चा उमेदवार भाजपाच्या चिन्हावर लढवण्यास तयार आहे. त्यामुळे आरपीआयच्या माध्यमातून भाजपाला एक मतदार संघ मिळणार असल्यामुळे स्थानिक पातळीवरील बैठकीत तसा ठरावही मंजूर केला आहे. त्यामुळे पिंपरीची निवडणूक 'कमळ'च्या चिन्हावर 'आरपीआय'चा उमेदवार.. अशा 'फॉम्युला'वर होईल. २०१४ मध्ये आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे यांनी 'कमळ' चिन्हावर लढण्यास नकार दिला होता. त्या निवडणुकीत अवघ्या दोन हजार मतांनी त्यांचा पराभव झाला. आता आगामी निवडणुकीत सोनकांबळे ती चूक पुन्हा करणार नाहीत. निवडणुकीला आणखी ५० ते ६० दिवसांचा कालावधी आहे. या काळात अनेक राजकीय घडामोडी घडणार आहेत. त्यामुळे कोण-कोणत्या चिन्हावर लढणार आणि कोण अपक्ष मैदानात उतरणार... हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. परंतु, पिंपरीत बहुरंगी लढत होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

---

## अजित गव्हाणे यांनी आरोग्य यंत्रणेला आणली जाग

### भोसरी सेक्टर 12 मध्ये धुरीकरण, 7 हजार रहिवासीयांना दिलासा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात डेंगू, चिकनगुनिया, झिका आणि मलेरियाची साथ सुरू आहे. भोसरी येथील सेक्टर 12 या भागात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी येत होत्या. येथे तातडीने धुरीकरण करण्याची गरज होती. नागरिकांची ही गरज लक्षात घेऊन स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी आरोग्य यंत्रणेला जागे केले. गव्हाणे यांच्या पुढाकारामुळे आरोग्य यंत्रणेने तात्काळ दखल घेत या भागात धुरीकरण केले. यामुळे सेक्टर 12 या भागातील ७ हजार रहिवासीयांना दिलासा मिळाला आहे.**





याबाबत अजित गव्हाणे म्हणाले, पीएमआरडीएतर्फे स्पाईन रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या भोसरी सेक्टर १२ येथील गृह प्रकल्पातील सोसायट्यांमध्ये डेंगू, मलेरिया, झिका, चिकनगुनिया यासारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव गेल्या महिन्याभरापासून वाढला आहे. याबाबत पालिकेकडून योग्य उपाय योजना केल्या जात नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून तपासणी मोहीम हाती घेतली जाते. मात्र त्यानंतर या आजारांना आळा घालण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. यामुळे येथे रोगांचा प्रादुर्भाव प्रचंड प्रमाणात वाढला आहे. तपासणी मोहीम करणे, नागरिकांना नोटिसा बजावणे. एवढेच सोपस्कार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून पार पाडले जातात अशा नागरिकांच्या तक्रारी होत्या.

नागरिकांनी याबाबत स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्याकडे तक्रार केली.

#### कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव कमी होणार

या भागांमध्ये रुग्णांची संख्या पाहता तातडीने धुरीकरण करावे अशी नागरिकांची मागणी लक्षात घेऊन तात्काळ गव्हाणे यांनी महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेशी चर्चा करून धुरीकरण करण्यात यावे अशी सूचना देखील त्यांनी केली होती. त्यांच्या सूचनेची दखल घेऊन महापालिकेने या भागामध्ये धुरीकरण सुरू केले असून दररोज तीन इमारतीमध्ये धुरीकरण करण्यात येणार आहे. या भागात साधारण 7 हजार नागरिक राहतात. कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव धुरीकरण केल्यानंतर कमी होणार असल्यामुळे या नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे अजित गव्हाणे यांनी सांगितले.

# बेघर मुले आणि अनाथ बालके




**स्वत:वर आलेल्या संकटाने खचून जायचे की त्यावर मात करत इतरांनाही आधार देण्यासाठी हात पुढे करायचा हे ज्याच्या त्याच्या मनोबलावर ठरते. सोलापूर जिल्ह्यातील अनु मोहिते आणि प्रसाद मोहिते यांनी दुसरा पर्याय स्वीकारला. त्यातून साकारले आअनु आणि प्रसाद हे दाम्पत्य आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आधार देण्याचा प्रयत्न करत वाटचाल करत आहेत.**

पण ती पुरेशी नाही.लापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात मोरवंची येथे अनु आणि प्रसाद मोहिते या तरुण दाम्पत्याने 'प्रार्थना फाउंडेशन'च्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील निराधार, त्यावरची बेघर मुले आणि अनाथ बालके तसेच वृद्धांना आधार दिला आहे. गेली दहा वर्षे सुरू असलेल्या या समाजसेवेची पार्श्वभूमी तशीच रोमांचकारी आणि प्रेरणादायी आहे. या सेवाव्रताला समाजाचा आधार हवा आहे.एमएसडब्ल्यू समाजकार्याची शैक्षणिक पदवी घेतलेल्या अनु आणि प्रसाद यांची समाजकार्यात सक्रिय असताना एकमेकांशी ओळख झाली. प्रसाद विठ्ठल मोहिते हा बार्शी तालुक्यातील वैरागजवळील इर्लेवाडी या छोट्याशा गावातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलगा. तर अनंतम्मा कृष्णया तिरकमान म्हणजेच अनु ही सोलापूरच्या सोमवार पेठेतील



सामान्य कुटुंबातील एका मिल कामगाराची मुलगी. सामाजिक जाणिवेतून समाजकार्याला सुरुवात केल्यानंतर त्याचसाठी सर्व आयुष्य व्यथित करायचे अशी शपथ घेऊन त्यांनी सामूहिक विवाह सोहळ्यात आंतरजातीय विवाह केला. लग्नातच अवयवदान आणि देहदानाचा संकल्प करून त्यांनी एक सामाजिक संदेशही दिला. आतापर्यंतच्या आयुष्यात दाहक अनुभवाने संवेदनक्षम बनलेल्या या समविचारी दाम्पत्याने अनाथ, फुटपाथवर भिक्षा मागणाऱ्या दहा मुलांना 'वंचितांची शाळा-एक पाऊल प्रगतीकडे' या प्रकल्पाला सुरुवात केली. या माध्यमातून वंचित आणि शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणताना अनु आणि प्रसाद दोघेही नोकरी करीत होते. परंतु नोकरीमुळे वेळेचे गणित जुळेना. मग प्रसादने ऑटोरिक्षा घेतली. ती चालवून पैसे आणि हवा तसा वेळ मिळू लागला. अनुने उदरनिर्वाहासाठी मेस सुरू करण्याचा पर्याय निवडला. याचदरम्यान, काळाने त्यांच्या बाळावर घाला घातला. या कठीण परिस्थितीतही धीर धरत तान्ह्या बाळाचे देहदान करून त्यांनी आणखी एक आदर्श घालून दिला. आपल्या दिवंगत बाळाच्या स्मरणार्थ अनु आणि प्रसाद यांनी 'प्रार्थना फाउंडेशन'ची स्थापना केली. या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जाऊ लागले. भिक्षामुक्ती अभियानाच्या माध्यमातून 'मुलांना भीक देऊन दुर्बल बनवण्यापेक्षा, शिक्षण देऊन स्वावलंबी बनवा!' असा संदेश देत समाजात जनजागृती केली जाऊ लागली. दुसरीकडे तरुणांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी 'कृतिशील तरुणाई शिबीर' राबविण्यात येऊ लागले. अशा निवासी शिबिरात राज्यभरातून समाजभान जपणारी तरुणाई सहभागी होते. त्यामध्ये विविध सामाजिक समस्यांवर चर्चा होतात, सामाजिक क्षेत्रात योगदान देणारे कार्यकर्ते मुलांना मार्गदर्शन करतात आणि त्यांना स्वत:ची ओळख निर्माण करून देतात. ही मुले त्यानंतर आपापल्या भागातील समस्या सोडवण्याचा प्रयत्न करतात.अशा उपक्रमासाठी तसेच रस्त्यावरील बेघर आणि अनाथ मुले-मुली तसेच वृद्ध आजी-आजोबांसाठी 'प्रार्थना बालग्राम' हा निवासी प्रकल्प हक्काच्या जागेत असणे अधिक श्रेयस्कर म्हणून प्रसाद मोहिते यांनी तसा संकल्प केला. या कामी त्याच्या विधवा आईने आपली पाच एकर जमीन, सोने दिले. 'प्रार्थना बालग्राम'चे भूमिपूजन करायला पद्माश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांनी आनंदाने होकार दिला. मोहिते दाम्पत्याची धडपड, चिकाटी आणि समाजसेवेचा ध्यास पाहून निवासी प्रकल्पाच्या बांधकामाला मदत करण्यासाठी समाजातून अनेक हात पुढे आले. करोना महासाथीमुळे बालग्राम प्रकल्पातील दैनंदिन जीवनचक्र थांबले. येथील अनाथ मुलांवर, निराधार वृद्धांवर अक्षरश: उपासमारीची वेळ आली. या कठीण काळात अनाथ मुले, निराधार वृद्धांना जगवण्यासाठी काही ना काही उपाय करणे गरजेचे होते.

## प्रासंगिक »

### संघचालकांचे तरी ऐका

***जवळपास सव्वा वर्षानंतरही अनेक मणिपुरींना छावण्यांत राहावे लागत असताना, पुन्हा अधिक भयावह हिंसाचार सुरू झाला आहे...***

'मणिपुरातील परिस्थिती सुरळीत व्हावी यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न' करण्याचे आवाहन साक्षात सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी केले त्यास मंगळवारी (१० सप्टेंबर) तीन महिने होतील. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर आठवडाभरात (१० जून) भागवत यांनी सरकारला मणिपुरातील परिस्थिती किती गंभीर आहे याची जाणीव करून दिली आणि तेथील 'आग विझवण्यासाठी' त्वरा करण्याची गरज व्यक्त केली. त्याआधी अनेक पत्रकार, समाजाभ्यासक, विरोधी पक्षीय राजकारणी इत्यादींनी मणिपुरातील परिस्थितीकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. या सर्वांस सरकार नेहमीच कस्पटासमान लेखते याचा अनुभव अनेकदा आलेला आहेच. पण दस्तुरखुद्द सरसंघचालक मणिपूरबाबत जाणीव करून देत असताना त्यांच्या म्हणण्याकडे तरी सरकार दुर्लक्ष करणार नाही, अशी आशा होती.

अलीकडे भावना एवढ्या नाजूक झाल्या आहेत की त्या कोणत्याही क्षुल्लक कारणावरून भयंकर दुखावल्या जातात. एखाद्या चित्रपट वा मालिकेतल्या कोणत्या प्रसंगावरून, शब्दावरून, दृश्यावरून त्या दुखावल्या जातील याचा नेम नसतो.

## भावना दुखावून घेण्याची साथ आली आहे का?

पद्मावत, लव्हयात्री, रामलीला, आदिपुरुष, सेक्रेड गेम्स, महाराजा, तांडव... यादी लांबलचक आहे. कधी इतिहासाशी छेडछाड, कधी धार्मिक प्रतीकांचा अवमान, कधी निव्वळ एखाद्या धर्माशी निगडीत रंगाचा वापर, कधी एखाद्या उत्सवाच्या नावाशी साधर्म्य अशा कोणत्याही कारणावरून भावना वरचेवर दुखावल्या जातच असतात. ताजं निमित्त आहे आयसी-८१४ द कंदाहार हायजॅक या वेबमालिकेतल्या पात्रांना देण्यात आलेल्या नावांचं. खरंतर ही नावं काही लेखक दिग्दर्शकांनीही दिलेली नाहीत, मात्र तरीही त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे.ज्या सत्यघटनेवर ही वेबमालिका आधारित आहे, ती घडली २५ वर्षांपूर्वी- २४ डिसेंबर १९९९ रोजी. काठमांडूहून दिल्लीला निघालेल्या आयसी- ८१४ या विमानाचं हरकत- उल- मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेने अपहरण केलं. विमान अमृतसर, लाहोर, दुबईहून अफगाणिस्तानात कंदाहारला नेण्यात



आलं. त्या आठ दिवसांत घडलेल्या घटनांवर आधारित एक पुस्तक त्या विमानाच्या कॅप्टनने लिहिलं होतं. अनुभव सिन्हा यांनी त्यावर आधारित एका वेबमालिकेची निर्मिती केली आणि ती नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली. मालिकेत दाखविलेल्या अपहरणकर्त्यांची नावे भोला, शंकर, बर्गर, डॉक्टर आणि चिफ अशी आहेत. त्यावरून असा वाद उद्भवला की भोला आणि शंकर ही हिंदू देवतांची नावे अपहरणकर्त्यांना देऊन हिंदूंच्या भावना दुखावण्याचा आणि अपहरणकर्ते हिंदू असल्याचे दर्शवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हिंदू सेना या संघटनेच्या अध्यक्षांनी या वेबमालिकेवर बंदी घालण्यात यावी, अशी याचिका दाखल केली. अखेर मालिकेत अपहरणकर्त्यांची मूळ नावं आणि त्यांनी घेतलेली टोपण नावं नमूद असणारी सूचना समाविष्ट करण्यात आली.पण इंडियन एस्क्प्रेसच्या वृत्तानुसार ही नावे काही २०२४मध्ये काल्पनिकरित्या देण्यात आलेली नाहीत. १९९९ मध्ये अपहरणकर्त्यांनी हीच सांकेतिक नावे घेतली होती. तेव्हा प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांत हीच नावं नमूद होती. एवढंच नव्हे तर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या संकेतस्थळावरही हीच सांकेतिक नावं दिलेली होती. या वृत्तात यासंदर्भात उद्भवलेल्या वादाची संभावना मॅन्युफॅक्चर्ड आउटरेज म्हणजेच निर्माण केला गेलेला असंतोष अशा शब्दांत करण्यात आली आहे. इंडियन एक्स्प्रेसच्याच अन्य एका वृत्तात बॉलीवुडमध्ये संरक्षण आणि गुप्तचर विभागाच्या कार्याचं नेहमीच कसं चुकीचं आणि अतिरंजित चित्रण केलं जातं, याचा आढावा घेण्यात आला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मी माझ्या अटकेची वाट पाहतोय!

## अनिल देशमुखः फडणवीसांच्या कृपेने माझ्या घरी कधीही छापा पडू शकतो

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात काही दिवसांपूर्वी सीबीआयने एका प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. भाजपाचे नेते गिरीश महाजन यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी जळगावच्या तत्कालीन पोलीस अधीक्षकांवर अनिल देशमुखांनी गृहमंत्री असताना दबाव टाकल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आलेला आहे. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर अनिल देशमुखांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**



अशातच आता अनिल देशमुख यांनी या प्रकरणावर भाष्य करत देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप केले आहेत. अनिल देशमुख यांनी एक्सवर(ट्विटर) यासंदर्भातील एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, "देवेंद्र फडणवीसांच्या कृपेने माझ्या घरी कधीही छापा पडू शकतो, मला अटक केली जाऊ शकते. देवेंद्र फडणवीस मी माझ्या अटकेची वाट पाहतोय", असं अनिल देशमुखांनी म्हटलं आहे. दरम्यान, अनिल देशमुखांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. जळगावमधील चार वर्षांपूर्वीचं एक जूने प्रकरण उकरून काढत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कृपेने 'सीबीआय'ने माझ्यावर गुन्हा दाखल केला आहे. जळगावमधील भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्या एका प्रकरणात मी गृहमंत्री असताना पोलिसांवर दबाव टाकून त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप माझ्यावर करण्यात आला आहे. माझी माहिती अशी आहे की, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कृपेने माझ्या घरी कधीही छापा पडू शकतो किंवा मला अटक केली जाऊ शकते. मात्र, महाराष्ट्रातील जनतेला सर्व माहिती आहे की, देवेंद्र फडणवीस यांनी ईडी आणि 'सीबीआय'चा वापर करत राज्यातील राजकारण खराब करण्याचा प्रयत्न केला आहे. माझी माहिती आहे की, मला अटक केलं जाईल. मला अटक करायचं असेल तर मी तयार आहे", असं अनिल देशमुख यांनी म्हटलं आहे. महाविकास आघाडी सरकार असताना तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी गिरीश महाजन यांना अटक करण्याचा प्रयत्न होता, असा आरोप करण्यात आला होता. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत एक पेन ड्राईव्ह देखील सादर केला होता. तसेच तत्कालीन पोलीस अधिक्षक प्रवीण मुंडे यांनी अनिल देशमुख आपल्याला सातत्याने फोन करत होते, असं जबाबात म्हटलं होतं. याप्रकरणी सीबीआयने अनिल देशमुख यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.अशातच आता अनिल देशमुख यांनी या प्रकरणावर भाष्य करत देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप केले आहेत. अनिल देशमुख यांनी एक्सवर(ट्विटर) यासंदर्भातील एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, "देवेंद्र फडणवीसांच्या कृपेने माझ्या घरी कधीही छापा पडू शकतो, मला अटक केली जाऊ शकते. देवेंद्र फडणवीस मी माझ्या अटकेची वाट पाहतोय", असं अनिल देशमुखांनी म्हटलं आहे. दरम्यान, अनिल देशमुखांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. जळगावमधील चार वर्षांपूर्वीचं एक जूने प्रकरण उकरून काढत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कृपेने 'सीबीआय'ने माझ्यावर गुन्हा दाखल केला आहे. जळगावमधील भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्या एका प्रकरणात मी गृहमंत्री असताना पोलिसांवर दबाव टाकून त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप माझ्यावर करण्यात आला आहे. माझी माहिती अशी आहे की, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कृपेने माझ्या घरी कधीही छापा पडू शकतो किंवा मला अटक केली जाऊ शकगृहमंत्री अनिल देशमुख यांनी गिरीश महाजन यांना अटक करण्याचा प्रयत्न होता, असा आरोप करण्यात आला होता. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत एक पेन ड्राईव्ह देखील सादर केला होता.

### देशमुखांच्या अडचणी वाढण्याची शक्यता

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात काही दिवसांपूर्वी सीबीआयने एका प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. भाजपाचे नेते गिरीश महाजन यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी जळगावच्या तत्कालीन पोलीस अधीक्षकांवर अनिल देशमुखांनी गृहमंत्री असताना दबाव टाकल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आलेला आहे. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर अनिल देशमुखांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# जरांगेंच्या आंदोलनातून आघाडीला सत्तेत आणण्याचा डाव

## अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांचा जरांगेवर हल्लाबोल

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बार्शीचे भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी गेल्या काही दिवसांत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर संशय व्यक्त करत हल्ला चढवला आहे. यामध्ये राऊत यांनी सोमवारी पुन्हा एकदा जरांगे यांच्यावर कठोर शब्दात प्रहार केला. जरांगे हे आंदोलन आरक्षणासाठी करत नसून यातून त्यांचा महाविकास आघाडीला सत्तेत आणण्याचा डाव आहे.**

याबाबत सगळ्या जनतेलाच आता संशय निर्माण झाला असल्याची टीकाही राऊत यांनी या वेळी केली.बार्शीत प्रसार माध्यमांशी बोलताना आमदार राऊत यांनी जरांगे यांच्या मराठा आंदोलनावर शंका उपस्थित करीत, त्यांचे आंदोलन मूळ हेतूपासून वेगळ्या मार्गाने भरकटल्याचा आरोप केला. बार्शीत मराठा कार्यकर्त्यांनी जरांगे-पाटील यांना मराठा आरक्षणासंदर्भात विविध अकरा प्रश्न उपस्थित करून आंदोलन सुरू केले आहे. त्याची उत्तरे जरांगे-पाटील यांनी द्यावीत, अशी मागणी आमदार राऊत यांनी केली.राऊत म्हणाले, की मी यापूर्वी मराठा आरक्षण प्रश्नावर आंतरवाली सराटीत अनेकवेळा



जाऊन मनोज जरांगे यांच्याशी चर्चा केली होती. परंतु गेल्या ११ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बार्शीत येऊन आपले विरोधक माजी मंत्री दिलीप सोपल यांची भेट घेतली. त्यानंतर आपण राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यावर टीका केली होती. तेव्हापासून जरांगे हे आपल्याविरुद्ध भाष्य करीत आहेत, असा आरोप आमदार राऊत यांनी केला.मराठा आरक्षण आंदोलन अलीकडे वेगळ्या दिशेने भरकटले असताना आंदोलन करण्यासह जरांगे-पाटील यांनी खुल्या चर्चेची दारे उघडी ठेवली पाहिजेत. आंदोलन करावे. महाविकास आघाडीला राजकीय फायदा मिळावा या अप्रमाणिक हेतूने आंदोलन करू नये.

### आंदोलन भरकटले

त्यांच्या आंदोलनाची दिशा सध्या तरी योग्य वाटत नाही, असे मत राऊत यांनी व्यक्त केले. जरांगे यांची शासनाने लावलेली एसआयटी चौकशी मागे घ्यावी, अशी आग्रही मागणी करणारा मी एकमेव आमदार असल्याचा दावाही त्यांनी केला. जरांगे यांना अहंकाराने पछाडले आहे. त्यांनी अहंकार बाजूला ठेवून मराठा आरक्षणासाठी लेखी आराखडा तयार करावा. त्यासाठी तज्ज्ञ मंडळींची मदत घ्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला.बार्शीचे भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी गेल्या काही दिवसांत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर संशय व्यक्त करत हल्ला चढवला आहे.

# विरोधी पक्षनेतेपद जबाबदार पद आहे!

## राहुल गांधींच्या मनात मोदींच्या विरोधी भावना रुजल्या

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते, खासदार राहुल गांधी हे सध्या चार दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते तेथील भारतीय नागरिकांशीही संवाद साधणार आहेत. मात्र, त्याआधी राहुल गांधींनी व्हर्जिनियातील हेरंडन येथे एका कार्यक्रमात बोलताना विविध विषयासंदर्भात भाष्य करत भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली.**



### गांधींवर भाजपाने हल्लाबोल केला

मात्र, त्यांनी परदेशात जाऊन केलेल्या टीकेवरून भाजपाचे नेते, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी अटलबिहारी वाजपेयी यांचं उदाहरण देत त्यांच्यामध्ये आणि राहुल गांधींमध्ये काय फरक होता? हे सांगत राहुल गांधींवर टीका केली आहे. यासंदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे."यासाठी लढा सुरु आहे की भारतात शिखांना पगडी घालण्याची परवानगी दिली जाईल? शीखांना भारतात कडा घालण्याची परवानगी दिली जाईल? ते गुरुद्वारामध्ये जाऊ शकतील? फक्त शीख धर्मीयांसाठी हा लढा नाही, तर सर्व धर्मांसाठी आहे", असं राहुल गांधींनी म्हटलं होतं. त्यांच्या या विधानानंतर भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते आरपी सिंह यांनी राहुल गांधींवर भाजपाने हल्लाबोल केला आहे.

तसेच यावेळी बोलताना राहुल गांधींनी शीख धर्मीयांशी संबंधित केलेल्या एका वक्तव्यामुळे भाजपाने राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. तसेच राहुल गांधी विरोधी पक्षनेते आहेत. मात्र, त्यांनी परदेशात जाऊन केलेल्या टीकेवरून भाजपाचे नेते, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी अटलबिहारी वाजपेयी यांचं उदाहरण देत त्यांच्यामध्ये आणि राहुल गांधींमध्ये काय फरक होता? हे सांगत राहुल गांधींवर टीका केली आहे. यासंदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे."यासाठी लढा सुरु आहे की भारतात शिखांना पगडी घालण्याची परवानगी दिली जाईल? शीखांना भारतात कडा घालण्याची परवानगी दिली जाईल? ते गुरुद्वारामध्ये जाऊ शकतील? फक्त शीख धर्मीयांसाठी हा लढा नाही, तर सर्व धर्मांसाठी आहे", असं राहुल गांधींनी म्हटलं होतं. त्यांच्या या विधानानंतर भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते आरपी सिंह यांनी राहुल गांधींवर भाजपाने हल्लाबोल केला आहे.राहुल गांधींच्या वक्तव्यावर केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनीही प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "विरोधी पक्षनेते म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी परदेशात कधीही सरकारवर टीका केली नाही. राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. विरोधी पक्षनेतेपद हे एक जबाबदार पद आहे. मला राहुल गांधींना आठवण करून द्यायची आहे की, अटलबिहारी वाजपेयी जेव्हा विरोधी पक्षनेते होते, तेव्हा ते परदेशात गेल्यानंतर त्यांनी कधीही देशाची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न केला नाही. मात्र, आता काँग्रेस सलग तिसऱ्यांदा पराभूत झाल्यामुळे राहुल गांधींच्या मनात भाजपाविरोधी, 'आरएसएस'विरोधी आणि मोदींच्या विरोधी भावना रुजल्या आहेत. त्यामुळे प्रतिमा खराब करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु आहे. मग आणीबाणी कोणी लादली? आता काँग्रेसने काही दिवसांपूर्वी भारत जोडो यात्रा काढली पण राहुल गांधी हे कधीही भारताशी आणि भारतातील लोकांशी एकजूट होऊ शकले नाहीत", अशी टीका शिवराज सिंह चौहान यांनी केली आहे.राहुल गांधींनी केलेल्या विधानाला प्रत्युत्तर देताना आरपी सिंह म्हणाले, "१९८४ मध्ये दिल्लीत तीन हजार शीखांची हत्या करण्यात आली. त्यांच्या पगड्या काढण्यात आल्या. केस कापण्यात आले, दाढी काढण्यात आली. मग हे सर्व झालं तेव्हा देशात काँग्रेसची सत्ता होती, हे राहुल गांधी सांगत नाहीत. आता मी राहुल गांधी यांना आव्हान देतो की, ते शिखांबद्दल जे बोलले आहेत, ते त्यांनी पुन्हा भारतात बोलावं. मी त्यांच्यावर गुन्हा दाखल करेन, त्यांना न्यायालयात खेचू", असं आरपी सिंह यांनी म्हटलं आहे.राहुल गांधींच्या वक्तव्यावर केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनीही प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "अनेक वर्षांपासून तुष्टीकरणाचे राजकारण करणारी आणि शीख हत्याकांडासाठी जबाबदार असलेली काँग्रेस आता व्याख्यान देण्याचा प्रयत्न करत आहे. राहुल गांधींनी लिखित स्वरूपात ४०० जागा मिळवून देऊ, असा दावा केला होता. मात्र, काँग्रेस फक्त ९९ पेक्षा जास्त जागा जिंकू शकलं नाही आणि ते आता ४०० जागा जिंकण्याविषयी बोलत आहेत. अशा दाव्यांना जोरदार प्रत्युत्तर द्यावं लागेल", असं मंत्री गिरीराज सिंह यांनी म्हटलं आहे.तसेच यावेळी बोलताना राहुल गांधींनी शीख धर्मीयांशी संबंधित केलेल्या एका वक्तव्यामुळे भाजपाने राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. तसेच राहुल गांधी विरोधी पक्षनेते आहेत.

# पुरी बूच यांना इतके पैसे कसे मिळत होते?

## माधबी पुरी बूच यांच्यावर काँग्रेसने पुन्हा एकदा गंभीर आरोप केले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हिंडेनबर्ग रिसर्चने गेल्या काही दिवसांपूर्वी अदानी समूहावर गंभीर आरोप केले होते. त्या आरोपांचा परिणाम अदानी समुहातील कंपन्यांच्या शेअर्सवर झाला होता. त्यानंतर हिंडेनबर्ग रिसर्चने सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी बूच आणि त्यांचे पती धवल बूच यांच्यावरही आरोप केले होते. हिंडेनबर्गच्या आरोपानंतर आर्थिक क्षेत्रापासून राजकीय वर्तुळापर्यंत याचे पडसाद उमटले होते.**



### हे नियमांचं उल्लंघन आहे

महिंद्रा अँड महिंद्राकडून माधबी पुरी बूच यांचे पती धवल बूच यांना २०१९-२१ च्या दरम्यान ४ कोटी ७८ लाख रुपये मिळाले", असा खळबळजनक आरोप काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी केला आहे. माधबी पुरी बूच यांनी 'अगोरा'च्या माध्यमातून २ कोटी ९५ लाख रुपये कमावले. यामध्ये सर्वाधिक ८८ टक्के पैसे महिंद्रा अँड महिंद्राकडून आले. त्याच वेळी माधबी पुरी बूच यांचे पती धवल बूच यांना महिंद्रा अँड महिंद्राकडून २०१९-२१ च्या दरम्यान ४ कोटी ७८ लाख रुपये मिळाले. तेव्हा माधबी पुरी बूच या सेबीच्या पूर्णवेळ सदस्य होत्या. त्यामुळे हे नियमांचं उल्लंघन आहे.

यातच संसदेच्या लोकलेखा समितीनेआपल्या वार्षिक कार्यक्रमात 'सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया'च्या लेखाजोखा घेण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी माध्यमात होते. पुरी बूच यांच्यावर काँग्रेसने पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत. माधबी पुरी बूच यांच्यावर काँग्रेसने केलेल्या आरोपामुळे मोठी खळबळ उडली आहे.

काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी आज पत्रकार परिषद घेत माधबी पुरी बूच यांच्यावर आरोपांच्या फैरी झाडल्या आहेत. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही हल्लाबोल करत काही सवाल उपस्थित केले आहेत. "माधबी पुरी बूच यांनी काही कंपन्यांच्या माध्यमातून कोट्यवधींची कमाई केली असून 'अगोरा'च्या माध्यमातून २ कोटी ९५ लाख रुपये कमावले.

# || गौरी आवाहन ते गौरी विसर्जन ||

**गणपती बसल्यानंतर दुसऱ्या दिवशी ऋषीपंचमी आणि यानंतर होते ते गौरी आवाहन. गौरी पूजन हे देखील भाद्रपद महिन्यातील महत्वाचे व्रत आहे. ज्येष्ठा गौरीचे प्रत्येकाकडे आपआपल्या परंपरेप्रमाणे पूजन होते. गौरी आवाहन ते गौरी विसर्जन यादरम्यान काय काय केले जाते. याची माहिती खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...**

अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात गौरीचे पूजन करतात. एका पौराणिक कथेनुसार, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण गेल्या. तिची प्रार्थना केली. गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार केला. तेव्हापासून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. गौरी किंवा महालक्ष्मीचे पूजन ज्येष्ठ नक्षत्रावर केले जाते, म्हणून यांना ज्येष्ठागौरी असेही संबोधले जाते.



## गौरी आवाहन

पहिला दिवस गौरी आवाहनाचा असतो. आपापल्या पद्धत आणि परंपरेप्रमाणे घरातील प्रवेशद्वारापासून ते गौरी स्थापन करण्याच्या जागेपर्यंत रांगोळीने लक्ष्मीच्या पावलांचे ठसे काढावेत. हातात गौरी घेऊन आलेल्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुवावे आणि त्यावर कुंकवाचे स्वस्तिक काढावे. आता येताना लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे आणावेत. गौरी आगमन करत असताना ताट चमच्याने किंवा घंटेने वाजत गाजत गौरीचे स्वागत करावे. गौरीची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील समृद्धी, दूध-दुभत्याची जागा अशा गोष्टी दाखवाव्यात. आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो, अशी प्रार्थना करावी. अशा या प्रथेला गौरी आवाहन करणे, असे संबोधतात.

## गौरी पूजन

शुक्रवार २२ सप्टेंबर २०२३ दुसऱ्या दिवशी गौरी पूजनाचा असतो. दुपारी १२ वाजेपर्यंत गौरीला नैवेद्य दाखवावा. या दिवशी काही सगेसोयरीक जेवणाला सांगितले जातात. गौरी पूजन आणि आरती करतात तसेच जेवायला पुरणपोळी, ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, लोणचे इत्यादी करतात.

## गौरी विसर्जन

शनिवार २३ सप्टेंबर २०२३ः तिसरा दिवस म्हणजे गौरी विसर्जनाचा असतो. यादिवशी सकाळी पोवत्याच्या/सुताच्या गाठी पाडतात. त्या सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, फुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. यांमध्ये हळदीकुंकू, रेशमी सूत, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल हे महत्त्वाच्या वस्तू असतात. नंतर गौरींची/महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. गोड शेवयाची खीर, उडीद डाळीचा भाजलेला पापड याचा नैवेद्य दाखवतात. या तिसऱ्या दिवशी गौरींच्या/महालक्ष्मींच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उदासीनता दिसून येते. गौरींची पूजा, आरती करून पुढील वर्षी येण्याचे आमंत्रण देऊन त्यांचा निरोप घेतला जातो, आणि त्यांचे विसर्जन केले जाते. (धातूच्या किंवा कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत.) गौरींचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडुपांचे कीटकांपासून संरक्षण होते अशी समजूत आहे. सकाळी ९ ते दुपारी २ वाजून ५६ मिनिटापर्यंत ज्येष्ठा गौरीचे विसर्जन करावे.







## गौरी स्वागत

गौरींचे आगमन हे नक्षत्रानुसार होते. अनुराधा नक्षत्रामध्ये गौरींचे आगमन होते आणि मूळ नक्षत्रात त्यांचे विसर्जन केले जाते. पहिल्या दिवशी तुळशीपासून पावला-पावलांनी डोक्यावरून गौरींना घरात आणले जाते. यावेळी "गौरी आली, सोन्याच्या पावली...गौरी आली, चांदीच्या पावली...गौरी आली, गाई वासराच्या पावली...गौरी आली, पुत्र-पौत्रांच्या पावली..." असे म्हणत गौरींचे माहेरवाशीणीसारखे स्वागत केले जाते. त्यांना नवीन साड्या आणि दागदागिने घालून सजवले जाते. पहिल्या दिवशी गौरीला भाकरी भाजीचा नैवद्य दाखविला जातो.

## गौरी दर्शन

दुसऱ्या दिवशी, जेष्ठा नक्षत्रावर गौरींचे पूजन केले जाते आणि गोडधोडाचे जेवण केले जाते. यामध्ये १६ भाज्या, ५ कोशिंबिरी, पुरणाचा स्वयंपाक असे पंचपक्वान्न केले जातात. या दिवशी सवाष्ण आणि ब्राह्मणांना जेवायला बोलावले जाते. तसेच गौरींना लाडू, चिवडा, करंज्या असे फराळाचे पदार्थ, मिठाई, फळे यांचाही नैवद्य दाखविला जातो. तसेच गौरीला विविध प्रकारची फुले आणि पत्री वाहिली जातात. सायंकाळी विवाहित स्त्रियांना हळदी-कुंकवासाठी बोलावले जाते. तसेच कुटुंबातील सदस्य, नातेवाईकाना आणि मित्र-मैत्रिणींना गौरीच्या दर्शनासाठी घरी बोलावतात.

## ओवसा

अनेक ठिकाणी गौरी पूजनाच्या दिवशी ओवसा भरण्याची पद्धत असते. ओवसा म्हणजे गौरीला ओवाळणे किंवा ओवसणे , ज्याला ववसा असेही म्हटले जाते. या परंपरेद्वारे घरातील सुनेला मानसन्मान दिला जातो. त्यांना त्यांच्या आवडीच्या भेटवस्तू अथवा पैसेही दिले

## गौरीसह गणरायाचे विसर्जन

तिसऱ्या दिवशी मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन केले जाते. काही जणांकडे गौरीसह गणरायाचे विसर्जन केले जाते, तर काही जणांकडे विसर्जन झाल्यानंतर १० दिवसांनीच गणपतीचे विसर्जन होते.

## ज्येष्ठ गौरी आवाहनाचे महत्त्व

या दिवशी माता गौरी म्हणजे माता पार्वती आणि गणेशाची पूजा केली जाते. गणेश चतुर्थीच्या दोन दिवसांनी माता पार्वती कैलास पर्वतावरून धरतीवर अवतरित झाली होती, असे मानले जाते. गणरायाप्रमाणेच गौरींचेदेखील उत्साहत स्वागत होते. यावेळी फुलांनी आणि कलाकुसरीच्या वस्तूंनी सजावट केली जाते. बाजारात सुंदर आणि सुबक असे गौरीचे मुखवटे मिळतात. यामध्ये शाडू, पितळे, कापडी, फायबरचे असे काही प्रकार पाहायला मळातात. काही जण केवळ मुखवट्यांची पूजा करतात, तर काही जणांकडे उभ्या गौरी असतात. कोकणात काही ठिकाणी खुर्चीवर बसलेली गौरी पाहायला मिळते. तसेच समुद्र किंवा नदीतील खडा आणून पूजण्याची रितही असते. काही ठिकाणी तांब्यावर चेहरा रेखाटून गौरी पूजन केले जाते. प्रत्येक कुटुंबात आपआपल्या पद्धतीनुसार गौरी बसविल्या जातात. मनोभावे गौरींची स्थापना करून त्यांचे पूजन केले जाते. महाराष्ट्रात या सणाला महालक्ष्मी पूजन असेही म्हटले जाते.

# मुशीरच्या खेळीवर आगरकर फिदा!

## मुशीर फक्त 7 सामने खेळूनही जाणार ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय संघाला यंदा पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जायचं आहे. प्रसिद्ध बॉर्डर गावसकर ट्रॉफीचे सामने यंदा ऑस्ट्रेलियात खेळवले जाणार आहेत, ज्यामध्ये डे-नाईट कसोटीही खेळवली जाणार आहे. पण तत्पूर्वी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारताचा अ संघ जाणार आहे. दुलीप ट्रॉफी आणि इराणी कपच्या धर्तीवर या संघासाठी खेळाडूंची निवड केली जाईल. मुंबईचा १९ वर्षीय युवा फलंदाज मुशीर खान या दौऱ्यावर जाणार हे निश्चित मानले जात आहे.**



युवा अष्टपैलू खेळाडू मुशीर खानचा प्रथम श्रेणी क्रिकेटमधील हंगाम उत्कृष्ट राहिला आहे. रणजी उपांत्यपूर्व फेरीत द्विशतक आणि अंतिम फेरीत शतक झळकावणाऱ्या मुशीर खानने दुलीप ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात शतक झळकावले. भारत अ विरुद्ध भारत ब संघाकडून खेळताना त्याने १८१ धावांची इनिंग खेळली. संघाने ९४ धावांवर ७ विकेट गमावल्या असताना ही खेळी त्याच्या बॅटमधून आली. याआधी मुशीरने अंडर-१९ वर्ल्ड कपमध्येही दोन शतके झळकावली होती.मीडिया रिपोर्ट्सनुसार, मुशीर खान इंडिया ए संघाबरोबर ऑस्ट्रेलियाला जाणार आहे. या दौऱ्यात तीन-चार दिवसांचे सामने खेळवले जाणार आहेत. मुशीरने अलीकडे देशांतर्गत क्रिकेटमध्ये खूप धावा केल्या आहेत. रणजी ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीत त्याने मुंबईसाठी द्विशतक झळकावले. अंतिम सामन्यातही त्याने १३६ धावांची खेळी केली होती. त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी हंगामात त्याने तीन सामन्यांत ४३३ धावा केल्या. दुलीप ट्रॉफीमध्ये भारत बी संघाकडून खेळताना त्याने पहिल्या डावात १८४ धावा केल्या होत्या. मुशीरने आपल्या उत्कृष्ट फलंदाजीमुळे निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले.बीसीसीआयला तरुण खेळाडू तयार करायचे आहेत. याच कारणामुळे बीसीसीआयचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर मुशीरला ऑस्ट्रेलियाला पाठवू इच्छित आहेत. मुशीरशिवाय राजस्थानचा फिरकी गोलंदाज मानव सुथारलाही संधी मिळणार आहे. वृत्तानुसार, अक्षर पटेल आणि रवींद्र जडेजा यांच्या जागी सुथारला नियुक्त केले जाणार आहे.दुलीप ट्रॉफीच्या दुसऱ्या फेरीचे सामने १२ सप्टेंबरपासून खेळवले जाणार आहेत. याआधी बीसीसीआयने नव्या संघाची घोषणा केली आहे. पुढील फेरीसाठी अनेक संघांमध्ये मोठे बदल दिसून आले आहेत. बांगलादेशसोबतच्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी निवडलेल्या खेळाडूंच्या जागी हे बदल करण्यात आले आहेत. नव्या खेळाडूंची प्रत्येक संघात वर्णी झाली आहे तर भारत ए संघाला नवा कर्णधार मिळाला आहे. बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया १३ सप्टेंबरपासून सुरूवात करणार आहे, यासाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणाही केली आहे. त्यामुळे या संघात निवडलेले खेळाडू दुलीप ट्रॉफीच्या दुसऱ्या फेरीचा सामना खेळू शकणार नाहीत. दुलीप ट्रॉफीमध्ये या खेळाडूंच्या जागी कोणत्या नवीन खेळाडूंना संधी मिळाली आहे ते जाणून घेऊया. दुलीप ट्रॉफीमध्ये भारत-ए संघाचा कर्णधार शुबमन गिलची भारतीय संघात निवड झाल्यानंतर मयंक

### मुशीरने 181 धावांची इनिंग खेळली

युवा अष्टपैलू खेळाडू मुशीर खानचा प्रथम श्रेणी क्रिकेटमधील हंगाम उत्कृष्ट राहिला आहे. रणजी उपांत्यपूर्व फेरीत द्विशतक आणि अंतिम फेरीत शतक झळकावणाऱ्या मुशीर खानने दुलीप ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात शतक झळकावले. भारत अ विरुद्ध भारत ब संघाकडून खेळताना त्याने १८१ धावांची इनिंग खेळली. संघाने ९४ धावांवर ७ विकेट गमावल्या असताना ही खेळी त्याच्या बॅटमधून आली. याआधी मुशीरने अंडर-१९ वर्ल्ड कपमध्येही दोन शतके झळकावली होती.मीडिया रिपोर्ट्सनुसार, मुशीर खान इंडिया ए संघाबरोबर ऑस्ट्रेलियाला जाणार आहे.

अग्रवालचे नशीब उजळले आहे. त्याच्याकडे भारत-ए संघाची कमान सोपवण्यात आली आहे. शुबमन गिलच्या जागी रेल्वेच्या प्रथम सिंगचा, केएल राहुलच्या जागी विदर्भाच्या अक्षय वाडकरचा आणि ध्रुव जुरेलच्या जागी आंध्र प्रदेशच्या एसके रशीदचा भारत-ए संघात समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर कुलदीप यादवच्या जागी शम्स मुलानी आणि आकाशदीपच्या जागी आकिब खानला संधी देण्यात आली आहे.या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत भारत-बी कडून खेळलेले यशस्वी जैस्वाल आणि ऋषभ पंत यांची बांगलादेशविरुद्धच्या टीम इंडियात निवड झाली आहे. निवडकर्त्यांनी यशस्वी जैस्वालच्या जागी सुयश प्रभुदेसाई आणि ऋषभ पंतच्या जागी टीम-बीमध्ये रिंकू सिंगची निवड केली आहे. त्याचबरोबर संघात समाविष्ट असलेला वेगवान गोलंदाज यश दयाल यालाही टीम इंडियामध्ये स्थान मिळाले आहे, त्याच्या जागी हिमांशू मंत्रीचा संघात समावेश करण्यात आला आहे. अक्षर पटेलला दुलीप ट्रॉफीच्या इंडिया-डी संघातून भारतीय वरिष्ठ संघात स्थान मिळाले आहे. त्यामुळे अक्षर पटेलच्या जागी निशांत सिंधूचा संघात समावेश करण्यात आला आहे. त्याचवेळी तुषार देशपांडे दुखापतीमुळे दुसऱ्या फेरीतून बाहेर पडला असून त्याच्या जागी भारत-अ संघाच्या विद्वथ कवेरप्पाला संघात स्थान देण्यात आले आहे. बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया १३ सप्टेंबरपासून सुरूवात करणार आहे, यासाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणाही केली.

# आम्ही इथे कधीच परत येणार नाही

## नोएडा स्टेडियमच्या गैरव्यवस्थापनावर अफगाणिस्तान संतापला

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अफगाणिस्तानचा क्रिकेट संघ न्यूझीलंडविरूद्ध एक कसोटी सामना खेळणार आहे. हा सामना भारतातील ग्रेटर नोएडा स्टेडियम येथे होणार आहे. अफगाणिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यातील ऐतिहासिक एकमेव कसोटी सामन्याचा पहिला दिवस शहीद विजयसिंग पथिक क्रीडा संकुलातील पाण्याटा निचरा करण्याची खराब पद्धत, ओले आउटफिल्ड आणि दयनीय सुविधांमुळे कसोटी सामन्याचा पहिला दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला.**



रात्रीच्या रिमझिम पावसाशिवाय सोमवारी दिवसभर पाऊस पडला नाही, मात्र आधुनिक सोयीसुविधांचा अभाव असल्याने मैदान तयार करण्यासाठी अननुभवी मैदान सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांची दमछाक झाली. दिवसभरात पंचांनी सहा वेळा पाहणी केली, पण अखेरीस पहिल्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला. यानंतर अफगाणिस्तान संघाच्या खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली आहे.कर्णधार टीम साऊदी, अष्टपैलू मिचेल सँटनर आणि

### अफगाणिस्तानचा संघ नाखूश

नाणेफेक दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता होणार होती परंतु आज दुसऱ्या दिवशीही पावसामुळे अद्याप नाणेफेक झाली नाही. एसीबीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, 'इथे कोणतीही सुविधा नाही, आम्ही इथे परत येणार नाही. आमची पहिली पसंती लखनौला असेल. इथे साध्या सुविधाही नाहीत. या ठिकाणी संपूर्ण गैरव्यवस्थापन आहे. इतकंच नव्हे तर खेळाडूही प्रशिक्षण सुविधा आणि सर्व गोष्टींबाबत खूश नाहीत.

रचिन रवींद्र यांच्यासह न्यूझीलंडचे अनेक खेळाडू मैदानाची पाहणी करण्यासाठी आले होते. पण मिड-ऑन आणि मिड-विकेट हा चिंतेचा विषय होता, तर ३०-यार्ड वर्तुळातही बरेच पॅच ओले होते. एकदा का चांगला सूर्यप्रकाश आला की सामना सुरू होईल असे वाटले पण तसे होऊ शकले नाही. ट्रॉट देखील मैदानाची देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नाराज दिसले. दुपारी १ नंतर सुपर सोपर्स देखील बसविण्यात आले. अखेर पहिल्या दिवशी दुपारी ४ वाजता पहिल्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला.